ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख २० सप्टेंबर, १९६१ | अंक १८



आश्चर्यकारक बहु-उद्देशीय विमा पॉलिसी

## त्यानें एकदांच २८८ रु. भरले व कुटुंबासाठीं १,०१,८८० रु. ठेवले ....

घरांतील कर्त्या माणसाच्या निधनाबरोबरच, घरांत येणारा उत्पन्नाचा झराहि आटतो. पण, बहु-उद्देशीय पॉलिसी घेणारा कर्ता माणूस जातो, तेव्हां उत्पन्नाचा नवा झरा त्याच्या घरांत निर्माण होतो. पुढें दिलेल्या सत्यकथेवरून ह्या अद्भुत पॉलिसीच्या सामर्थ्याची कल्पना येईल.

● एकदां एका तरुण इंजिनियरने एक २०,००० रुपयांची बहु-उद्देशीय पॉलिसी दुहेरी अपघाताच्या फायद्यासह घेतली. दैवयोगानें थोड्याच दिवसांत त्याला अपघात झाला व तो मरण पावला. त्या पॉलिसीमुळें त्याच्या कुटुंबियांस :-

- *लगेच २०,००० रुपये मिळाले (दुहेरी अपघाताचा फायदा),*
- *अधिक २,००० रुपये मृत्युसंस्कार, कायद्याच्या व इतर खर्चासाठीं मिळाले,*
- *अधिक दरमहा रु. ४०० दोन वर्षेपर्यंत मिळण्याची तरतूद झाली,*
- *अधिक दरमहा रु. २०० पुढें २१ वर्षेपर्यंत मिळण्याची खात्री देण्यांत आली,*
- *अधिक बोनसची रक्कम मिळेल,*
- *अधिक रु. १८,००० पॉलिसीची मुदत संपल्यावर मिळतील.*

ह्या तरुण गृहस्थानें हप्त्याचें रूपाने अवघे २८८ रुपये भरले. पण त्याबद्दल, त्याच्या कुटुंबाला २३ वर्षांच्या काळांत, ठराविक अंतराने, एकूण १,०१,८८० रुपये मिळतील. तो जगला असतां तर अर्थातच पॉलिसीची मुदत संपल्यावर २०,००० रुपये व बोनसची रक्कम त्याला मिळाली असती.

बहु-उद्देशीय विमा पॉलिसी लगेच घ्या.
त्यामुळें तुमच्या कुटुंबास खरेखुरें संरक्षण मिळतें.

आयुर्विम्याला पर्याय नाहीं

pratibha-61-5

# विविध माहिती

**छोट्या मोटारींच्या कारखान्याची जागा**—छोट्या मोटारींचा कारखाना कोठें काढण्यांत यावा ह्यासंबंधीं अद्याप निर्णय घेण्यांत आलेला नाहीं. बिहार सरकारनें भारत सरकारला अशी शिफारस केली आहे कीं संकल्पित कारखाना रांचीजवळ काढण्यांत यावा. राज्य सरकारच्या मतानें ही जागा भौगोलिक दृष्ट्या व कच्चा माल मिळण्याच्या दृष्टीनें सोयीस्कर आहे. कारखान्यासाठी हैद्राबादचें नांवहि सुचविण्यांत आलें आहे.

**४४ वर्षांतील सर्वांत अधिक पाऊस**—हवामान खात्याच्या एका प्रमुख अधिकाऱ्यानें अशी माहिती सांगितली आहे कीं १९६१ सालीं पडलेला पाऊस गेल्या ४४ वर्षांत सर्वांत अधिक आहे. त्यामुळें पूरहि मोठ्या प्रमाणावर आले. १९१७ सालीं असाच बेसुमार पाऊस आणि मोठे पूर आलेले होते. त्याहि पूर्वी १८७८ व १८९२ सालीं भरमसाठ पाऊस व पूर ह्यांची आपत्ति आली होती.

**सरकारी नोकरांसाठी बिऱ्हाडांच्या जागा**—मध्यवर्ती सरकारनें पुण्यामधील आपल्या नोकरांसाठी ५०० बिऱ्हाडांच्या जागा बांधण्याचें ठरविलें आहे. घरबांधणीचें हें काम तांतडीनें करण्यांत येणार असून त्यासाठी ५५ लाख रुपये खर्च येणार आहे. घरांसाठी जागा शोधण्याचें काम चालू आहे. पुण्यांतील पूरग्रस्तांना घरें पुरविण्याच्या कामीं महाराष्ट्र सरकारला मदत म्हणून ही योजना हातीं घेण्यांत आली आहे.

**एंजिनांच्या व्यापारांत मंदी**—श्रीरामपूर भागांत तेलावर चालणाऱ्या एंजिनांचा व्यापार मंदावला आहे. दरमहा १०० एंजिनें खपावयाचीं त्या ठिकाणीं अवघ्या १० एंजिनांचा उठाव होत आहे. सुमारें १० लाख रुपयांचीं एंजिनें बाजारांत पडून आहेत. कमाल जमीन धारणाबिलामुळें शेतमालक शेतीच्या विकासाचें काम करण्यास नाखूष आहेत. त्यामुळें ही परिस्थिति उद्भवली असल्याचें म्हणतात.

**तेलाच्या शोधासाठी जादा मागणी**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत तेलाच्या शोधासाठी व उत्पादनासाठी जी तरतूद करण्यांत आली आहे तींत मोठ्या प्रमाणावर वाढ करण्याची मागणी खाणी व तेलखात्यांतर्फे करण्यांत आली आहे. ह्या कामासाठी नियोजन समितीनें १२८ कोटी रुपये मंजूर केले आहेत. परंतु खात्यातर्फे आणखी ९० कोटी रुपयांची मागणी करण्यांत आली आहे. त्यांपैकीं ३० कोटी रुपये परदेशी चलनांत मागण्यांत आले आहेत.

**अहमदाबाद-कांडला रस्ता**—अहमदाबाद-कांडला ह्या राजरस्त्याचें काम आतां बरेंच प्रगत झालें आहे. हा रस्ता देवपुरा, बंकानेर व मोरवी मार्गानें जाणार आहे. रस्त्यावर एकूण ४ पूल बांधण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं दोन पुलांना मिळून सुमारें ४१ लाख रुपये खर्च येणार आहे. त्याशिवाय कच्छच्या रणांतहि एक पूल बांधण्यांत येणार आहे.

**रेडरच्या साधनाचा विकास**—रेडरच्या साधनाचा विकास करून ते आणखी उपयुक्त करण्यांत अमेरिकेंतील नाविक खात्याच्या संशोधकांनीं यश मिळविलें आहे. ह्या नव्या रेडरच्या साह्यानें दूर अंतराचा प्रवास करणाऱ्या विमानांचा मार्ग क्षणाक्षणाला कळूं शकेल. त्याचप्रमाणें विमानाला अपघात झाल्यास अपघाताची जागा निश्चित करण्याच्या कामींहि वैमानिकाचे रेडिओ संदेश बंद पडले तरी चांगलें साह्य होईल.

**मंगला धरणाचें काम**—काश्मीरमधील पाकिस्तानव्याप्त भागांत मंगला धरण बांधण्यासाठी आठ आंतरराष्ट्रीय कंपन्यांनीं पाकिस्तान सरकारकडे टेंडर्स पाठविलीं होतीं. त्यांपैकीं ४ कंपन्यांनीं ह्या कामांतून आपलें अंग काढून घेतलें आहे. प्राप्तीवरील भरमसाठ कर आणि कामाचें प्रचंड स्वरूप लक्षांत घेऊन वरील कंपन्यांनीं हा निर्णय घेतला आहे.

**यंत्रचालित नांगरांचें उत्पादन**—पाकिस्तानांत यंत्रचालित नांगरांचें उत्पादन करण्यासाठी एक कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना काढण्यासाठी पश्चिम जर्मनीचें साह्य मिळविण्यांत आलें आहे. पश्चिम जर्मनींतील ही कंपनी पाकिस्तानला यांत्रिक हत्यारांच्या कारखान्यासाठी ही मदत देणार आहे. यंत्रचालित नांगराच्या कारखान्यांत दरसाल १,५०० नांगर तयार करण्यांत येतील. नंतर कारखान्याचें उत्पादन ५,००० पर्यंत वाढविण्यांत येईल.

**अमेरिकेंतील भयानक वादळ**—अमेरिकेंतील लुइझिआना व टेक्सास ह्या प्रांतांतील किनाऱ्यांवर मेक्सिकोच्या आखातांतून आलेलें भयानक वादळ कोसळलें. ह्या वादळाचा वेग ताशीं १५० मैलांचा होता. वादळांतून सुटका करून घेण्यासाठी २ लाख, ५० हजार लोक मिळेल त्या वाहनानें उत्तरेकडे निघून गेले. नैसर्गिक आपत्तीमुळें इतक्या मोठ्या लोकसंख्येला स्थलांतर करावें लागण्याचा हा अभूतपूर्व प्रसंग आहे.

**ऑस्ट्रेलिअन तरुणींशीं विवाह**—इंडोनेशिआच्या शिक्षणमंत्र्यांनीं अशी तक्रार केली आहे कीं, इंडोनेशिआंतून ऑस्ट्रेलिआंत शिकण्यासाठी जाणारे बरेच तरुण ऑस्ट्रेलिअन तरुणींशीं विवाहबद्ध होतात. कोलंबो योजनेप्रमाणें हे विद्यार्थी ऑस्ट्रेलिआला पाठविले जातात. त्यावेळीं त्यांच्याकडून मायदेशीं परत येण्याचें लिहून घेण्यांत आलेलें असतें. तरीहि ते विवाहबद्ध होतात आणि ऑस्ट्रेलिअन सरकारच्या परवानगीनें तेथें स्थायिक होतात.

**सौराष्ट्रामधील पाणीपुरवठ्याची योजना**—सौराष्ट्रामधील राजकोट जिल्ह्यांतील मच्छू पाणीपुरवठ्याच्या योजनेला लवकरच प्रारंभ करण्यांत येणार आहे. मच्छू नदीवर १२,००० फूट लांबीचें मातीचें धरण बांधून ३५६ कोटी घनफूट पाणी सांठविण्यांत येणार आहे. ह्या धरणासाठी १ कोटी, ८१ लाख रुपये खर्च येणार असून तें पूर्ण झाल्यावर २८,००० एकर शेतजमिनीला हुकमी पाणीपुरवठा होऊं शकेल.

**कापूर तयार करण्याचा कारखाना**—इंडिअन सॅफर लि. ह्या नांवाची एक कंपनी कृत्रिम कापूर तयार करण्यासाठी काढण्यांत येणार आहे. कंपनी खाजगी मालकीची असून तिला अमेरिकन कंपनीचें सहकार्य मिळणार आहे. कंपनीचें भांडवल १ कोटी रुपयांचें असेल. अमेरिकन कंपनीच्या सहकार्यानें दरसाल १,००० टन कृत्रिम कापूर तयार करण्याचा परवाना तिला देण्यांत आला आहे. कारखाना कल्याणजवळ निघणार आहे.

**केरळ विद्यापीठाला देणगी**—त्रावणकोरच्या महाराजांनीं आपला खाजगी ग्रंथसंग्रह केरळ विद्यापीठाला देणगी म्हणून दिला आहे. हा संग्रह महाराजांच्या घराण्यानें कित्येक शतकांत जमविलेला आहे. त्यांत कांहीं प्राचीन भूर्जपत्रेंहि आहेत. भूर्जपत्रावरील ग्रंथांची संख्या ३,००० आहे. बहुतेक ग्रंथ संस्कृत भाषेंत असून कांहीं मलयलम भाषेंत आहेत. आयुर्वेद, फलज्योतिष, पुराणें, इत्यादि विषयांवरील ग्रंथ त्यांत आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. २० सप्टेंबर, १९६१





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## डिपॉझिट इन्शुअरन्सची योजना

व्यापारी बँकांमधील ठेवींचा विमा उतरविणारी कॉर्पोरेशन स्थापन करणारें बिल लोकसभेंत मांडण्यांत आलें आहे. अशा तऱ्हेची डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशन फक्त अमेरिकेंत असून, १९३३ पासून ती अस्तित्वांत आहे. अर्थखात्याचे उपमंत्रि श्री. भगत ह्यांनीं बिल मांडतांना सांगितलें कीं, व्यापारी बँकांकडील ९६% पेक्षा जास्त ठेवी सुरक्षित असल्याचा ठेवीदारांचा विश्वास आहे; ४% इतक्याच ठेवींचे बाबत चिंता निर्माण होण्याची शक्यता आहे. ठेवीदारांना निश्चिंत करण्यासाठीच ठेवींच्या विम्याची योजना करण्यांत आली आहे. व्यापारी बँकांकडे ठेवींचीं सध्यां सुमारें ६० लक्ष खातीं आहेत. सरासरी ठेवींची रक्कम अर्थातच बदलत जाते. एकूण खात्यांपैकी ७५% खातीं आणि एकूण ठेवींपैकी २०% ठेवी ह्या विमायोजनेच्या संरक्षणाखाली येतील. विम्याच्या हप्त्याचा दर तूर्त शेंकडा ५ नये पैसे एवढा राहील. जरूर पडली तर तो १५ नये पैशांपर्यंत वाढवितां येण्याची योजनेंत तरतूद आहे. त्याचप्रमाणें, विम्याची मर्यादा १,५०० रु. आहे ती जरूर तर आणि कॉर्पोरेशनला शक्य झालें तर वाढवितां येईल. प्रत्यक्ष अनुभवावर विम्याचा हप्ता आणि किमान संरक्षण हीं अवलंबून राहातील. ठेवी घेणाऱ्या इतर संस्था कॉर्पोरेशनच्या कक्षेंत येणार नाहींत. उदाहरणार्थ, सहकारी बँका व्यापारी बँकांप्रमाणें बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या नियंत्रणाखाली नसल्यामुळें त्यांना ह्या योजनेंत समाविष्ट करणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें, बिगर-सभासदांकडून ठेवी घेणाऱ्या सहकारी सोसायटयांची संख्याहि फार मोठी आहे; पण विम्यास पात्र अशा ठेवींची रक्कम फार मोठी नाहीं. त्यांना विमायोजनेंत घेण्याला कायद्याच्याहि अडचणी आहेत. आपलें क्षेत्र वाढविण्यास समर्थ होण्याइतपत कॉर्पोरेशनचें आर्थिक बळ वाढल्यावरच ह्या सर्व गोष्टींचा पुन: विचार करतां येईल.

---

## पाकिस्तानमधील परदेशांची गुंतवणूक

हिंदुस्थानची फाळणी झाल्यापासून भारत व पाकिस्तान आपआपल्या परीनें औद्योगीकरण साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. भारताप्रमाणेंच पाकिस्तानलाहि अनेक परदेशांकडून आर्थिक मदत होत आहे. परंतु सामान्यपणें अमेरिकेकडून पाकिस्तानला मिळणाऱ्या मदतीची जितकी माहिती प्रसृत होते तितकी इतर परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीची होत: नाहीं. त्यांतहि पाकिस्तानला अमेरिकेकडून मिळणाऱ्या लष्करी स्वरूपाच्या मदतीचा अधिक गाजावाजा होतो. असें असलें तरी पाकिस्तानला आर्थिक मदत देण्याच्या कामीं अमेरिका आघाडीवर आहे असें मात्र नाहीं. गेल्या दोन वर्षांत पाकिस्तानमधील उद्योगधंद्यांत अनेक परदेशांनीं आपलें भांडवल गुंतविलेलें दिसून येतें. ही परदेशी भांडवलाची गुंतवणूक ह्याच काळांत खुद्द पाकिस्तानी नागरिकांनीं केलेल्या गुंतवणुकीच्या दुप्पट आहे. पाकिस्तान सरकारनें स्थापन केलेल्या इन्व्हेस्टमेंट प्रमोशन ब्यूरोनें ह्यासंबंधी कांहीं आंकडे प्रसिद्ध केले आहेत. त्यावरून असें दिसतें कीं गेल्या दोन वर्षांत १८८ उद्योगधंद्यांत मिळून सुमारें ५८·४ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यांत आली. त्यांपैकी २८·६ कोटी रुपयांची गुंतवणूक व कर्जे परदेशांकडून आलेलीं होतीं. एकूण गुंतवणुकीशीं परदेशांच्या गुंतवणुकीचें प्रमाण ६६ टक्के पडतें. पाकिस्तानमध्यें सर्वांत अधिक गुंतवणूक पश्चिम जर्मनीनें केली आहे. पश्चिम जर्मनीनें, १३·७ कोटी रुपयांचें कर्ज धरून, १७·५ कोटी रुपयांची मदत पाकिस्तानला दिली आहे. त्याच्या खालोखाल अमेरिकेनें ६·१ कोटी रुपयांची मदत दिली आहे. त्यांत निर्यात-आयात बँकेनें दिलेल्या ९६ लाख रुपयांचा समावेश आहे. ब्रिटननें ह्याच काळांत ५·४८ कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे.

---

## गुजरातमधील खनिज तेलाचें शुद्धीकरण

भारताच्या अर्थव्यवस्थेमधील एक कच्चा दुवा म्हणजे खनिज तेलाचें अपुरें उत्पादन. औद्योगिक युगांत ह्या तेलाचें महत्त्व एकसारखें वाढत चाललें आहे व वाढत जाणार आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन भारत सरकारनें कांहीं वर्षांपूर्वी देशाच्या निरनिराळ्या भागांत तेलाचे सांठे शोधण्याचें काम हातीं घेतलें. ह्या शोधांत गुजरात राज्यांत सर्वांत अधिक यश आलें. त्यांतल्या त्यांत गुजरात राज्यांतील अंकलेश्वर ह्या ठिकाणीं भूमिगत तेलाचा सांठा मोठ्या प्रमाणावर असल्याचें आढळून आलें. अंकलेश्वर येथील तेल-खाणींतून उपसण्यांत आलेलें १०० टन अशुद्ध तेल नुकतेंच मुंबई जवळील ट्रॉम्बे येथील कारखान्याकडे पाठविण्यांत आलें. हा तेलशुद्धीचा कारखाना बर्मा शेल कंपनीच्या मालकीचा आहे. अंकलेश्वर येथून पाठविण्यांत येणारें अशुद्ध तेल सध्यां बर्मा शेलच्या टाक्यांतून सांठविण्यांत येणार आहे. पुरेसा सांठा झाल्यावर पुढील वर्षाच्या आरंभापासून त्याचें शुद्धीकरण करण्यांत येईल. गुजरातमधील तेलाच्या खाणी सार्वजनिक मालकीच्या क्षेत्रांत असून त्यामधून रोज उपसण्यांत येणारें १०० टन अशुद्ध तेल मुंबईमधील तेलशुद्धीच्या कारखान्याकडे पाठविण्यांत येणार आहे. चालू वर्षअखेर अंकलेश्वर येथील खाणींचें उत्पादन दररोज १,५०० टनांपर्यंत वाढेल अशी अपेक्षा आहे. त्यांपैकी ९०० टन तेल बर्माशेल कंपनी शुद्ध करणार असून उरलेलें स्टॅनव्हॅक कंपनी शुद्ध करणार आहे. अंकलेश्वर येथील तेलाच्या शोधाची सुरवात गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यांत रशिअन तंत्रज्ञांच्या साह्यानें करण्यांत आली. प्रारंभ केल्यापासून ६० दिवसांच्या आंतच तेल सांपडलें. ह्या भागांत आतां बऱ्याच विहिरी खोदण्यांत आल्या आहेत. अंकलेश्वर येथें सांपडलेल्या तेलाचा भूमिगत सांठा चांगल्या प्रतीचा आहे असें म्हणतात.

---

## महाराष्ट्र स्टेट को. बँक लि.

### एकूण कर्जापैकी ३४·३०% कर्जे सहकारी साखर कारखान्यांना

बँकेचें एक महत्त्वाचें गिऱ्हाईक म्हणजे सहकारी साखर कारखाने. या वर्षांत आणखी एका कारखान्याचें काम सुरू झालें व एकूण १० कारखान्यांची गरज बँकेला प्रत्यक्ष भागवावी लागली. अहमदनगर बँकेनें दिलेल्या दोन साखरकारखान्यांच्या कर्जापोटीं या बँकेनें कर्ज यंदाहि त्या बँकेला दिलें. पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेनेंहि त्या बँकेने दोन कारखान्यांना पुरविलेल्या कर्जापोटीं रक्कम मिळावी म्हणून या बँकेला विनंती केली होती व तीहि मान्य करण्यांत आली. म्हणजे जे १४ साखरकारखाने सध्यां साखर तयार करीत आहेत त्या सर्वांना बँकेनें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष साहाय्य दिलें आहे. प्रत्येक कारखान्याला जें प्रत्यक्ष कर्ज पुरविलें जातें, तें येणेंप्रमाणें :— सर्वसाधारणपणें प्रत्येक कारखान्याला गुऱ्हाळाचे हंगामांत उसाचे किंमतीपोटीं द्याव्या लागणाऱ्या खर्चासाठीं ५ लाख रु. क्लीन क्रेडिट म्हणून मंजूर करण्यांत येते. ७ लाख रु. साखर तयार करण्यासाठी लागणाऱ्या मालापोटीं व ३० टक्के मार्जिननें साखरेच्या सांठ्यापोटीं गरजेनुसार कर्ज दिलें जातें. अहवालाचे सालीं साखरेचे साठे अतिशय पडून राहिल्यामुळें या सांठ्यापोटीं दिल्या जाणाऱ्या कर्जमर्यादा एकसारख्या वाढवाव्या लागल्या. त्या इतक्या कीं तीन कारखान्यांची मर्यादा तर प्रत्येकीं १ कोटी रु. इतकी गेली आणि चारांची मर्यादा ८० लाख होती. वर्षाचे अखेरीस देखील हे साठे वाढतच होते आणि नित्याचा खर्च भागविण्यासहि कारखान्यांना साधन राहिलें नाहीं. शिवाय या कारखान्यांची क्लीन क्रेडिटची मुदत ३० जून ६१ अखेर संपली होती. त्यामुळें त्यांना पूर्वीप्रमाणें ५ लाखाऐवजीं त्यांच्या साखरसांठ्याच्या १५ टक्के कर्जमर्यादा संचालक मंडळाला नाइलाजास्तव खास म्हणून मंजूर करावी लागली. ज्या कारखान्यांना इंडस्ट्रिअल कॉर्पोरेशनकडून घेतलेल्या मध्यम मुदतीच्या व दीर्घ मुदतीच्या कर्जाचे हप्ते भरावयाचे होते ते त्यांनीं सर्व भरले. साखरसांठ्यापोटीं द्यावयाच्या कर्जमर्यादेंत सर्वच वाढ केल्यामुळें व हंगामाव्यतिरिक्त दिवसांतील त्यांच्या गरजा भागविण्यासाठीं खास क्लीन क्रेडिट म्हणून जादा रक्कम दिल्यामुळें साखरकारखान्यांना दिलेल्या कर्जापोटीं ज्या मध्यवर्ति बँकांना बँकेनें कर्ज दिलें आहे त्यांच्याकडील येणें फारच वाढलें आहे. एकूण येणें खालील प्रमाणें होतें :—

| कर्जाचा प्रकार | रक्कम ( कोटी रु. ) |
|---|---|
| ( अ ) प्लेज क्रेडिट | ६·९२ |
| ( ब ) स्पेशल क्लीन क्रेडिट | ०·५७ |
| ( क ) हायपॉथिकेशन | ०·३७ |
| ( ड ) मध्यम मुदतीचें कर्ज | २·९३ |
| ( इ ) रीप्लेज क्रेडिट | २·०५ |
| एकूण | १२·८४ |

३० जून १९६१ रोजीं एकूण दिलेलीं कर्जे ३७·४२ कोटी रु. इतकी होतीं. यावरून असें दिसून येईल कीं साखरकारखान्यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दिलेलीं कर्जे एकूण कर्जाच्या ३४·३ टक्के होतीं.

### वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

अहवालाचे वर्षीं ह्या बँकेच्या सभासदांत ३० ची वाढ होऊन त्यांची संख्या १,००७ झाली, भागभांडवल ९०,७०० पर्यंत वाढलें आणि ठेवींत १८,१०० रु. ची भर पडून त्यांची रक्कम ४,५५,८४९ रु. झाली. थकबाकी कमीच होती, ती कार्यकारी मंडळाच्या प्रयत्नांनीं आणखी कमी झाली. बँकेला १३,८५७ रु. नफा झाला म्हणजे मागील वर्षापेक्षा तो २,६०० रु. नीं जास्त आहे.

### सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. मुंबई

अहवालाचे वर्षी बँकेच्या सभासद संख्येंत ६३८ सभासदांची वाढ होऊन त्यांची संख्या ६,६०१ झाली. त्यांपैकी ९९३ महिला आहेत. बँकेचे १० रु. दर्शनी किंमतीचे शेअर १२ रु. ५० नये पैसे दरानें विकले जाऊनहि वसूल भांडवल ३२,७०० रु. नीं वाढून तें ८,९१,६९० रु. झालें. ठेवींची रक्कम २३२·९३ लक्ष रु. ची २५२·५४ लक्ष रु. झाली. बँकेचे एकंदर रिझर्व्ह ९,७३,६३९ रु. चे १०,३९,६९० रु. वर गेले; ही रक्कम वसूल झालेल्या शेअर भांडवलाहून १,४८,००० रु. नीं जास्त असून कायद्यानुसार उभारलेल्या रिझर्व्ह निधीच्या दुप्पट आहे. बँकेला सेव्हिंग्ज खात्यांतील ठेवीदारांना मिळालेल्या व्याजाच्या ६½% बोनस देऊन आणि रीतिरिवाजाप्रमाणें तरतुदी करून १,१९,८७५ रु. निव्वळ नफा झाला.

### दूधदुभत्याच्या व्यवसायाचें शिक्षण

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेतकी उपसंघटनेतर्फे अहमदनगर येथें दूधदुभत्याच्या व्यवसायाचें शिक्षण देणारें एक केंद्र उघडण्यांत आलें आहे. ह्या केंद्रांत आशिआ व आफ्रिका खंडांतील २६ विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यांत येत आहे. अभ्यासक्रम तीन महिन्यांचा असून तो डेन्मार्कमधील एक तज्ज्ञाच्या देखरेखीखाली चालू आहे. शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनीं नगर येथील जिल्हा सहकारी दूध-उत्पादक संघाला भेट देऊन तेथील कार्याची पहाणी केली. ह्या संघातर्फे १८ सहकारी संघटनांकडून रोज ६,००० पौंड दूध गोळा करण्यांत येतें. त्यांपैकी कांहीं हिस्सा नगर शहरांत पुरविलें जातें व बाकीचे दररोज आरे येथील गौळवाड्याकडे पाठविण्यांत येतें. केंद्रांत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनीं संघाच्या कार्यकर्त्यांशीं चर्चा केली.

### ओसाड वाळवंटाच्या पोटांत गोड्या पाण्याचें तळें

राजस्थानमधील जेसलमीर ह्या भागांत जमिनीखाली गोड्या पाण्याचें तळें असण्याचा संभव आहे. ह्या भागांत टयूबवेल संघटनेनें पाण्याचा शोध चालविला आहे. राजस्थानच्या पश्चिम भागांत संघटनेनें १० टयूबवेल्स खोदल्या. परंतु त्यामधील एकाच विहिरींत भरपूर पाणी मिळालें. त्यानंतर आणखी १५ विहिरी खोदण्यांत आल्या व १० नव्या विहिरींच्या जागा निश्चित करण्यांत आल्या. नव्या विहिरींपैकी १२ विहिरींमधून दर तासाला १० हजार ते ४० हजार गॅलन पाणी मिळूं शकलें. भूमिगत पाण्याच्या सांठ्याचा विचार निश्चित करण्यासाठी भूगर्भ शास्त्रज्ञांनीं निरनिराळ्या ठिकाणीं आणखी १८ विहिरी खोदण्याची शिफारस केली आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## महाराष्ट्र बँकेच्या डेक्कन जिमखाना शाखेच्या कर्मचाऱ्यांचा गौरव

### महापुरांतील कर्तव्यदक्षतेबद्दल चेअरमनचे धन्योद्गार

गेल्या दिनांक १२ जुलैला आलेल्या महापुराचे वेळीं येथील महाराष्ट्र बँकेचे डेक्कन जिमखाना शाखेंत पुराचें पाणी शिरलें व कांहीं वेळ शाखेची संपूर्ण इमारत पाण्याखालीं होती. इमारतींत पाणी शिरूं लागलें असतां आपापल्या घरीं जाण्याची नैसर्गिक प्रवृत्ति सोडून कर्तव्यबुद्धि व प्रसंगावधान राखून शाखेचे एजंट श्री. केसकर व त्यांचे इतर १२।१४ सहकारी यांनीं बँकेची रोकड, कागदपत्रें व दस्तऐवज वगैरे सुरक्षित राखण्याचा प्राप्त परिस्थितींत शक्य तों प्रयत्न केला व त्यामुळें बँकेची सर्व रोकड सुरक्षित जागीं हलविली जाऊन बरेचसें दप्तरहि सुरक्षित राहिलें. या लोकांनीं प्रसंगानुरूप जें धैर्य, कर्तव्याभिमुखता व प्रसंगावधान दाखविलें त्याबद्दल बँकेनें त्यांस वैयक्तिक प्रशस्तीपत्रें दिलीं व त्यांच्या कार्याचा प्रतीकात्मक गौरव म्हणून प्रत्येकी रोख रुपये ३००/– व या प्रसंगाची आठवण राहण्यासाठी ५० रुपये किंमतीची चांदीची एक डबीहि त्यांस पारितोषिक म्हणून देण्याचें संचालक मंडळानें ठरविलें. सदर पारितोषिक देण्याचा समारंभ बँकेचे कार्यालयांत संचालक मंडळाचे अध्यक्ष श्री. वा. पुं. वर्दे यांचे हस्तें दि. १२ रोजीं झाला. श्री. वर्दे यांनीं, व्यवस्थापक व कर्मचारीवर्ग यांचे संबंध पहिल्यापासूनच सलोख्याचे, खेळीमेळीचे व आपुलकीचे आहेत व त्यामुळें प्रसंगोपात ते कर्तव्यबुद्धीनें व अहमहमिकेनें कार्य करण्यास पुढें येतात व संचालक मंडळहि त्यांचें योग्य तें चीज करतें हें आपल्या बँकेचें वैशिष्ट्य आहे असें सांगितलें. त्यानंतर सदर पुराचे वेळीं कर्तव्यजागृत राहून, पाण्यामुळें तेथें राहणें अशक्य होईपर्यंत जागेवर राहून काम करणाऱ्या सेवक बंधूंना वरीलप्रमाणें पारितोषिकें (रु. ३०० रोख व चांदीची डबी) व पुष्प गुच्छ अध्यक्षांनीं दिला.

### शाखा एजंट श्री. केसकर ह्यांचें आभार-प्रदर्शन

उत्तरादाखल भाषण करतांना जिमखाना शाखेचे शाखाधिकारी श्री. केसकर यांनीं आपण जें कांहीं केलें तें केवळ कर्तव्याचा एक भाग म्हणून व त्यावेळीं जी कांहीं अन्तःप्रेरणा झाली त्याप्रमाणें केलें; त्यांत खरोखर गौरव करून घेण्यासारखें असें कांहीं नाहीं व त्याची अपेक्षाहि नव्हती असें सांगितलें, व पूर आल्यापासून तों शाखा सुरू होईपर्यंतच्या काळांत शाखा पुन्हा पूर्ववत् सुरू करण्यास ज्या ज्या गोष्टी करणें आवश्यक होतें त्या करण्यांत आपलेपणानें व संस्थेवरील लोभानें जिमखाना शाखेंतील व मुख्य कचेरी व पुण्यांतील इतर शाखांतील ज्या सहकारी बंधूंनीं उत्स्फूर्त सहकार्य दिलें त्यांचे आभार मानून संचालक मंडळानें केलेल्या गौरवाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

---

### गांधी जयंतीनिमित्त खादीविक्रीवर जास्त सूट

गांधी जयंतीनिमित्त खादीच्या खरेदीवर नेहमीचा १ रुपयाला १२ नया पैसाचा रिबेटपेक्षा सहा नये पैसेची जास्त सूट देण्यांत येईल. हें रिबेट दोन आक्टोबर, १९६१ पासून ४५ दिवसांसाठी देशांतील प्रत्येक प्रमाणित खादीभाण्डारांतून मिळूं शकेल. राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाला प्रांतीय जरूरीप्रमाणें ही जास्त सूट दोन विभागांत देतां येईल. पहिला अवधि तीस दिवसांचा असून दोन आक्टोबरपासून सुरू होईल आणि दुसरा अवधि फक्त १५ दिवसांचा अनुकूलतेप्रमाणें राहील. राज्य बोर्डाला दुसऱ्या संस्थांशीं विचारविनिमय करून जास्त रिबेट देतां येईल.

---

### पलाई बँकेच्या ड्राफ्टहोल्डरांचा प्रश्न

पलाई सेंट्रल बँक लिक्विडेशनमध्यें गेली, तेव्हां तिनें दिलेले सुमारें १२ लक्ष रुपयांचे ड्राफ्ट तसेच अडकून पडले; ते धारण करणारांना रकमा मिळूं शकल्या नाहींत. त्यांना इतर घेणेकऱ्यांच्या आधीं अग्रहक्कानें रकमा मिळाव्या, अशी त्यांची मागणी होती, ती ऑफिशिअल लिक्विडेटरनें मान्य केली नाहीं. सुमारें ७० ड्राफ्टहोल्डरांनीं केरळ हायकोर्टाकडे अपील केलें आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडिया, कोचिनचे मॅनेजर आणि पलाई सेंट्रल बँकेचे मद्रास शाखेचे भूतपूर्व मॅनेजर ह्या दोघा बँक-अधिकाऱ्यांना साक्षीसाठी हायकोर्टानें समन्स काढलीं आहेत. डिमांड ड्राफ्टसंबंधीं सर्वसाधारण बँकिंगपद्धति काय आहे आणि पलाई बँकेंत काय पद्धति अंमलांत होती, हें समजून घेण्यासाठी त्यांना बोलावण्यांत आलें आहे.

---

### तेलाच्या शोधासाठी फ्रेंच कंपनीचें साह्य

राजस्थानमधील जेसलमीर भागांत भूमिगत तेलाचा शोध करण्याचें काम करण्यासाठी. भारत सरकारनें फ्रेंच पेट्रोलिअम इन्स्टिट्यूट ह्या संस्थेशीं करार केला आहे. ही कंपनी फ्रेंच सरकारच्या मालकीची आहे फ्रेंच कंपनी तेल व नैसर्गिक वायु कमिशनला तांत्रिक मदत देईल आणि पॅरिसमध्यें हिंदी तंत्रज्ञांना शिकवून तयार करील. तेलाच्या शोधासाठी करण्यांत यावयाच्या कामासाठी ४ कोटी रुपये परदेशीय चलनांत लागतील. ही रक्कम फ्रेंच सरकार देणार असलेल्या कर्जातून खर्च करण्यांत येणार आहे. फ्रेंच कंपनीची निवड मुद्दाम करण्यांत आली आहे. राजस्थानच्या पश्चिमेकडे असलेला जेसलमीर भाग सहारा वाळवंटासारखा आहे. उत्तर आफ्रिकेंतील ओसाड वालुकामय प्रदेशांत वरील कंपनीनें तेलाच्या शोधाचें काम केलेलें आहे. त्यामुळें कंपनीला अशा कामाचा चांगला अनुभव आहे.

---

**बडोदा विद्यापीठाचा उपक्रम**—तेलाचा शोध व उत्पादन ह्या विषयाचें शिक्षण देणारा अभ्यासक्रम चालू करण्याचा विचार बडोदा विद्यापीठ करीत आहे. ह्या बाबतींत मध्यवर्ती सरकारचे तेलमंत्री श्री. मालवीय ह्यांच्याशीं बोलणीं चालू आहेत. तीं यशस्वी झाल्यास गुजरात सरकारनें मदत देण्याची तयारी दाखविली आहे.

---


### सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लॅण्ड मॉर्गेज बँक लि., कराड.

#### फक्त समासदांकरतां

## नोटीस

सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लॅण्ड मॉर्गेज बँक लि., कराड, यांची २६ वी वार्षिक साधारण सभा कराड येथील बँकेच्या ऑफिसांत शनिवार ता. ३० सप्टेंबर, १९६१ रोजीं दुपारीं ३ वाजतां जनरल हॉलमध्यें भरणार आहे.

त्या वेळीं सभेंत सन १९६०–६१ चा अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक मंजूर करणें, नफा-वाटणी करणें, सन १९६१–६२ करतां जमाखर्चाचें अंदाजपत्रक मंजूर करणें, मे. डायरेक्टर्सची निवड जाहीर करणें, वगैरे कामें होणार आहेत.

तरी बँकेच्या सर्व सभासदांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंती आहे. कळावें.

कराड, नीलकंठराव आण्णाप्पा कल्याणी.

ता. २९-८-१९६१. चेअरमन.

**पाकिस्तानच्या नोकरांवर निर्बंध**— पाकिस्तानांतील सरकारी नौकरांनीं परदेशीय राजदूतांतर्फे साजऱ्या करण्यांत येणाऱ्या सांस्कृतिक समारंभांना वरिष्ठांच्या परवानगीशिवाय हजर राहूं नये, असा हुकूम काढण्यांत आला आहे. ह्याला अपवाद फक्त खात्यांच्या चिटणिसांचा आहे. सरकारी गुपितें फुटूं नयेत म्हणून ही दक्षता घेण्यांत आली आहे.

**मिरज येथील इस्पितळांत अमेरिकन डॉक्टर्स**—मिरज येथील वानलेस इस्पितळांत ४ अमेरिकन डॉक्टर्स ६ आठवडे काम करणार आहेत. हे डॉक्टर्स अमेरिकेच्या ओक्लाहामा संस्थानांतील असून तेवढा वेळ ते आपला खाजगी व्यवसाय बंद ठेवणार आहेत. चार डॉक्टरांत एक हृदयविकाराचा तज्ज्ञ असून दुसरा निष्णात शस्त्रवैद्य आहे. एकाचा सहा आठवड्यांचा काळ झाल्यावर मग दुसरा येणार आहे.

**नव्या विमानतळाबाबत धोरण**—मद्रास राज्यांतील एका व्यापारी संघटनेनें तुतिकोरीन येथें विमानतळ उभारण्याची विनंती केली होती; परंतु भारत सरकारच्या वहातूक व दळणवळण खात्यानें ही विनंती अमान्य केली आहे. ज्या ठिकाणीं विमानतळ उभारल्यामुळें नागरी विमानवहातुकीला उपयोग होईल अशाच ठिकाणीं नवे विमानतळ बांधण्याचें धोरण स्वीकारलें असल्यामुळें वरील विनंती मंजूर झाली नाहीं.

**वाढत्या लोकसंख्येचा अंदाज**—संयुक्तराष्ट्र संघटनेच्या आंकडेशास्त्रज्ञांनीं गोळा केलेल्या माहितीप्रमाणें जगाची लोकसंख्या ३०० कोटींच्या घरांत गेली आहे. लोकसंख्येंत दरसाल सुमारें ५·५ कोटींची भर पडत आहे. जगांतील एकूण लोकसंख्येपैकी ५६ टक्के लोकसंख्या आशिआ खंडांत आहे. आशिआच्या लोकसंख्येंत दरसाल २·२ ते ३·३ कोटी इतकी वाढ होत आहे.

**तेलाच्या विक्रीसाठी सहकारी संस्था**—येत्या डिसेंबरपासून इंडिअन ऑईल कंपनी बिहारमधील घासलेट तेलाची विक्री सहकारी संस्थांमार्फत करूं लागणार आहे. दिल्ली, कानपूर, हैद्राबाद, इत्यादि शहरांतून रॉकेलचें व डिझेल तेलाचें वांटप करण्याचें काम कंपनीनें ह्यापूर्वीच सुरू केले आहे.

**मुलांच्या चित्रकलेचें प्रदर्शन**—नवी दिल्ली येथें शंकर्स वुइकली ह्या साप्ताहिकातर्फे मुलांच्या चित्रकलेचें प्रदर्शन सालाबादप्रमाणें भरविण्यांत आलें होतें. ह्या प्रदर्शनांत २,००० तैलचित्रें ठेवण्यांत आलीं होतीं. तीं ७४ देशांतील मुलांकडून आलेलीं होतीं. स्पर्धेतील राष्ट्राध्यक्षांचें सुवर्णपदक एका पोलिश मुलीनें मिळविलें. मुलीचें वय १३ वर्षांचें आहे. स्पर्धेसाठी इतर ७४,००० चित्रें आलीं होतीं. ४०० चित्रांना बक्षिसाचा मान मिळाला.

**संत्र्यांच्या पिकावरील किडीविरुद्ध मोहीम** – विदर्भांतील संत्र्यांच्या पिकावर कीड पडून त्याचें फार नुकसान होतें. ह्या किडीविरुद्ध सतत तीन वर्षे मोहीम काढण्यांत येणार आहे. ह्या मोहिमेसाठी ४० लाख रुपये खर्च येणार आहे. विदर्भांत ३०,००० एकर जमिनींत संत्री व तत्सम फळांची लागवड करण्यांत येते. ह्या फळझाडांवर वर्षांतून ४ वेळां कीडनाशक औषधांचा फवारा मारण्यांत येणार आहे.

**पारव्याच्या अंड्याएवढा हिरा**—आफ्रिकेंत किंबर्ले येथील हिऱ्याच्या खाणींत पारव्याच्या अंड्याएवढा हिरा सांपडल्याचें वृत्त आहे. ह्या हिऱ्याचें वजन १४० कॅरेट भरेल व त्याची किंमत सुमारें ८० हजार पौंड होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.


# भोर स्टेट बँक लि.

(स्थापना १९४४)

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ५१,५०० |

**बँक लौकरच स्टेट बँक ऑफ इंडियामध्यें विलीन होणार आहे.**

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज-वसुली, पेन्शन, कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

**पुणें कचेरी** :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

**—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—**

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंदुके

# दि मिरज स्टेट बँक, लि.

**हेड ऑफिस : मिरज**

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९१९

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | : रुपये सहा लाख |
| खेळतें भांडवल | : रुपये एक कोट |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड | : रुपये सात लाख |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**मुदत ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर**

१ वर्ष ३½% ३ वर्षे ४½%
२ वर्षे ४% ४ वर्षे ५%
५ वर्षे ५%

**हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची उत्कृष्ट व्यवस्था.**

बँकेच्या शाखा: सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर, ॲड्व्होकेट, चेअरमन. — के. डी. शिराळकर, मॅनेजर.

## राष्ट्रीय अर्थव्यवस्थेंतील रस्त्यांवरील वहातुकीचें स्थान

गेल्या दहा वर्षांच्या कालांत भारतामधील रस्त्यावरील वहातुकीनें बरीच प्रगति केलेली आहे. रस्तावहातुकीच्या धंद्यासंबंधीं गोळा करण्यांत आलेल्या आकडेवार माहितीवरून ही गोष्ट चांगली लक्षांत येते. १९५०-५१ मध्यें भारतांत प्रवाशांची वहातूक करणाऱ्या मोटारगाड्यांची संख्या ३४,४११ होती आणि मालाची वहातूक करणाऱ्या मोटारगाड्यांची संख्या ८१,८८८ होती. दोन्ही मिळून मोटारगाड्यांची संख्या १,१६,२९९ होती. पुढील अवघ्या पांच वर्षांच्या काळांत प्रवासीवहातूक करणाऱ्या मोटारींची संख्या ४६,४६१ व मालवहातूक करणाऱ्या मोटारींची संख्या १,१९,०९७ इतकी झाली. म्हणजे १९५५-५६ पर्यंत मोटारींची संख्या ४९,२५९ नें वाढली. १९६० सालीं भारतांत २४,२११ मालवहातुकीच्या गाड्या आणि ६,१०७ प्रवासी वहातुकीच्या गाड्या निर्माण करण्यांत आल्या. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरच्या वर्षी २८,००० व्यापारी गाड्यांचें उत्पादन करण्यांत आलें. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस अशा गाड्यांचें वार्षिक उत्पादन ६०,००० च्या घरांत जाईल असा अंदाज करण्यांत आला आहे. मोटारवहातुकीशिवाय वहातुकीचीं वेगळीं साधनें असलीं तरी रस्त्यावरून होणारी मोटारवहातूक लोकप्रिय झालेली आहे. मोटारवहातुकींत कांहीं विशेष फायदे असल्यानें ती लोकप्रिय होते ह्यांत नवल नाहीं. कांहीं वस्तु अशा असतात कीं त्या त्वरेनें न्याव्या-आणाव्या लागतात. मोटारवहातुकीमुळें कोणताहि माल घरपोंच करणें सुलभ होतें; मालाची चढउतार पुन्हापुन्हा करावी लागत नाहीं; मुक्कामाला पोंचल्यावर माल तेथेंच पडून राहण्याची अगर चोरी होण्याची भीतीहि कमी असते.

हिंदमधील औद्योगीकरणाचा वेग आतां झपाट्यानें वाढूं लागला असल्यामुळें अनेक नव्या प्रकारचा माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं धाडण्याचें काम वाढतच जाणार आहे. त्यामुळें राष्ट्रीय अर्थव्यवस्थेंत रस्त्यावरील वहातुकीचें स्थान अधिक महत्त्वाचें होणार आहे. रस्तावहातुकीचा योग्य विकास होण्यासाठी पुरेशा मोटारगाड्या उपलब्ध असल्या पाहिजेत हें उघडच आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत राष्ट्रीयीकरण झालेल्या रस्तावहातूक संघटनांच्या मालकीच्या मोटारगाड्यांत आणखी ५,००० गाड्यांची भर पडेल अशी अपेक्षा आहे. ह्या कालखंडांत रस्तावाहतुकीचा जो विकास करण्यांत येईल तो मुख्यत: खाजगी मालकीच्या क्षेत्रांत होणार आहे. तथापि सार्वजनिक मालकीच्या रस्तावहातुकीच्या विभागाचा विस्तार करण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १८ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. निरनिराळ्या राज्यांतील स्टेट ट्रॅन्सपोर्ट संघटनांना मदत करण्यासाठी रेल्वेनें आपल्या कार्यक्रमांत व्यवस्था केली आहे. रस्तावहातुकीचा विकास करण्यास मदत म्हणून रेल्वेखात्याकडून १० कोटी रुपयांची मदत मिळेल असा अंदाज आहे. आंध्र प्रदेश, बिहार, गुजरात, महाराष्ट्र, पंजाब आणि पश्चिम बंगाल ह्या राज्यांतून सरकारी मालकीच्या रस्तावहातूक संघटना आहेतच. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत मध्यप्रदेश, म्हैसूर, ओरिसा आणि त्रिपुरा ह्या राज्यांतून स्टेट ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशन्सची स्थापना करण्यांत येणार आहे. आतांपर्यंत रस्त्यावरील वहातूक मुख्यत: कमी अंतरावरील ठिकाणांमध्यें होत आहे. परंतु दूर अंतरावरील ठिकाणांमध्येंहि रस्तावहातूक करण्याची प्रवृत्ति अलीकडे वाढत चाललेली आहे.

### घाणेरड्या वस्त्यांच्या उच्चाटणाची योजना

पश्चिम बंगाल आर्थिक विकास मंडळापुढें बोलतांना पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री डॉ. बी. सी. रॉय ह्यांनीं कलकत्त्यामधील गलिच्छ वस्त्या नाहींशा करण्याच्या योजनेची घोषणा केली. ह्या योजनेप्रमाणें सुमारें १८ कोटी रुपये खर्चून कलकत्त्याच्या परिसरांत २५,००० गाळे बांधण्यांत येणार आहेत. प्रत्येक गाळ्याचें भाडें १५ रुपये ठेवण्यांत येणार आहे. कामास ताबडतोब प्रारंभ करण्यांत येणार आहे. नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलनें देशांतील मोठ्या शहरांची सुधारणा करण्यासाठी ५० कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. ह्या रकमेपैकी २० कोटी रुपये पश्चिम बंगाल सरकारला देण्यांत येणार आहेत. ह्या रकमेंत राज्यसरकार १० कोटी रुपयांची भर घालील आणि कलकत्त्याच्या सुधारणेचें काम सुरू करील.

### दक्षिण भारतामधील कारखान्यांना परवाने

कांहीं दिवसांपूर्वी भारत-सरकारच्या उद्योग व व्यापारखात्याच्या परवानाकमिटीची बैठक दिल्ली येथें भरली होती. कमिटीनें मद्रासच्या एन्फिल्ड इंडिआ ह्या कंपनीला उद्योगधंद्यांसाठी व शेतीसाठी लागणारीं एंजिनें तयार करण्याचा परवाना देण्याची शिफारस केली आहे. दरमहा १,२५० एंजिनें तयार करण्याचा परवाना कंपनीला देण्यांत येणार आहे. जपानमधील हिटाची ह्या कंपनीनें केरळ राज्यांत विजेचे ट्रॅन्सफॉर्मर्स तयार करण्याचा कारखाना उभारण्याची तयारी दाखविली आहे. तथापि हिटाची कंपनीच्या सूचनेचा विचार अद्याप पूर्ण झालेला नाहीं. मद्रासमधील आणखी एका कंपनीला गुरांना लागणारी पेंड तयार करण्याचा कारखाना काढण्याची परवानगी द्यावी अशी शिफारस कमिटीनें केली आहे. कारखान्यांत दरसाल १०,००० टन गुरांचें खाद्य तयार होईल. हा कारखाना आंध्र प्रदेशांत निघण्याचा संभव आहे.

### रशिआला चीनचा पाठिंबा कां?

सोव्हिएट रशिआनें अणुशस्त्रांचे प्रायोगिक स्फोट पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय रशिआने चीनच्या दडपणानें घेतला असल्याचें आंतरराष्ट्रीय जाणकारांचें मत आहे. चीन स्वत:ला शांततेचा पुरस्कर्ता म्हणवीत असतो. तथापि तो स्वत:चे अणुबॉम्ब तयार करण्याच्या खटपटींत असल्याच्या वार्ता आहेत. रशिआनें अणुबॉम्बचे स्फोट बंद केल्यामुळें चीनची परिस्थिति अडचणीची झाली होती. आतां रशिआनें प्रायोगिक स्फोट पुन्हा चालू केल्यामुळें चीनला उजळ माथ्यानें अणुबॉम्बचा शोध चालू ठेवतां येईल. १९६२ सालांत केव्हां तरी चीन स्वत: बनविलेल्या अणुबॉम्बचा स्फोट करून पाहील असा अंदाज आहे. तसें झाल्यास अणुबॉम्बचें रहस्य जाणणारा तो पांचवा देश होईल.

**शुद्धीकरणासाठी उपवास**—मुंबईमधील एका जैन गृहस्थानें नागपूर येथें स्वत:च्या शुद्धीकरणासाठी ६० दिवसांचा उपवास करण्यास सुरुवात केली आहे. ह्या गृहस्थांनीं ह्यापूर्वीहि ४ वेळां दीर्घ मुदतीचे उपवास केलेले आहेत. प्रत्येक वेळीं त्यांच्या उपवासाचे दिवस त्यांनीं वाढविले. पहिला उपवास ३० दिवसांचा, दुसरा ४२ दिवसांचा, तिसरा ४८ दिवसांचा व चौथा ५० दिवसांचा होता.

**केबल तयार करण्याचा कारखाना**—पाटणा येथें केबल तयार करण्याचा एक खाजगी कारखाना काढण्यांत यावयाचा आहे. कारखान्यासाठी २ कोटी रुपयांचें भांडवल लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. कारखाना उभारण्यासाठी बिहार सरकारनें पूर्व जर्मनींतील एका कंपनीचें सहकार्य मिळविलें आहे.

## कामगारांना पैसा हवा; प्रतिष्ठा आणि गोड शब्दहि हवेत

**मालक आणि कामगार ह्यांच्यामधील संघर्षाची छाननी एका कामगारानें खालीलप्रमाणें केली आहे :—**

मालकांविषयीं आदराची भावना असावी, असें आम्हांस मनापासून वाटतें. पण, बहुतेक मालक आम्हांकडे ढुंकूनहि बघण्यास तयार नसतात, त्याला काय करावें ? चुकून ते आमच्यांत आलेच, तर त्यांना जाळ्यांत अडकल्यासारखें वाटतें. मालकवर्गाचा हा तुसडेपणा आणि कामगारांकडे माणुसकीच्या दृष्टीनें पाहण्याचा अभाव, ह्यामुळेंच युनियनची निर्मिति होते.

जादा वेतनाच्या मागणीपेक्षा ही तुच्छतेची भावनाच संघर्षाला कारणीभूत होते. कंपनीचा प्रेसिडेंट अगदीं प्रत्येक कामगाराला भेटूं शकणार नाहीं हें आम्हांला समजतें. पण जेव्हां आम्ही आमचें काम खरोखरच चांगल्या रीतीनें बजावतों, तेव्हां तरी त्याची जाणीव मालकांनीं दाखवायला नको का ?

"कंपनीच्या एका डायरेक्टराकडे कामगारांशीं संबंध राखण्याचें खास काम देण्यांत यावें. तो कामगारांचा खरा मित्र असावा; त्यानें कामगारविषयक प्रश्नांचीं उत्तरें सचोटीनें द्यावीं. मालकवर्गाच्या ह्या प्रतिनिधींसमोर कामगारांनीं आपलीं मतें मोकळेपणानें मांडावीं." ही माझी योजना मी शेंकडों कामगार-मित्रांपुढें मांडली. "कंपनीचा अध्यक्ष आपल्याला दमडीचीहि किंमत देत नाहीं; तो ह्या योजनेकडे मुळींच लक्ष देणार नाहीं" असा सगळ्यांचा अभिप्राय पडला. मी आव्हान स्वीकारून, कंपनीच्या अध्यक्षांची भेट घेण्याचा कसून प्रयत्न चालविला. सहा महिन्यांनीं मला मुलाखत लाभली; अध्यक्षांशीं नव्हे, तर उपाध्यक्षांशीं. मी माझी योजना त्यांना समजावून सांगितली आणि त्यांनीं ती शांतपणानें ऐकून घेतली. शेवटीं ते म्हणाले, "कामगारांशीं संपर्क येऊं देण्याच्या योजनेचा कंपनी विचार करील, ही तुमची कल्पनाच मुळीं खुळी आहे. अध्यक्ष दररोज कोट्यावधि रुपयांचे निर्णय घेत असतो. कंपनीला नफा मिळवून देणें, एवढीच त्याची जबाबदारी आहे. कामगारांना खुष करून, थोडेसे रुपये वांचवून असें काय मिळणार ? आमचा ताळेबंद आणि नफ्याचा आंकडा पाहा !"

कामगारांच्या हिताकडे पाहण्यांत मालकांना फायदा दिसत नाहीं, हें माझ्या अनुभवास आलें. माझी वासलात लावणारे उपाध्यक्ष हे अपवादात्मकच आहेत, असा पुरावा कामगारांना मिळाला, तरच त्यांना कंपनीविषयीं आपुलकी वाटेल, सहकार्य करावेंसें वाटेल.

उपाध्यक्षांचा हा दृष्टिकोन विसाव्या शतकाला साजेसा नाहीं, आजच्या कामगारांचा दृष्टिकोन उपेक्षा करण्यासारखा नाहीं, हें अधिकाधिक मालकांना सत्वर पटायला हवें.

— सॅटर्डे ईव्हिनिंग पोस्ट.

**चोऱ्या थांबविण्यासाठी कुत्र्यांचा उपयोग**—तिरुचिरापल्ली येथील रेल्वेच्या वर्कशॉपमधुन माल चोरीस जाण्याच्या तक्रारी करण्यांत आल्या आहेत. ह्या चोऱ्या थांबविण्यासाठी कुत्र्यांचा उपयोग करण्यांत येणार आहे. रेल्वेच्या संरक्षक दलानें ह्या कामासाठी ४ कुत्र्यांची एक तुकडी तयार करण्याचें ठरविलें आहे. मद्रास शहरांत ह्याच कामासाठी कुत्र्यांचा उपयोग करण्यांत येत आहे. चोऱ्या हुडकून काढण्यासाठीहि त्यांचा उपयोग होईल अशी अपेक्षा आहे.

## टागोरांचा सहकारी अर्थव्यवस्थेस पाठिंबा

टागोर जन्मशताब्दीचा फायदा घेऊन संशोधकांनीं टागोरांच्या आर्थिक विचारसरणीचा शोध करून निष्कर्ष काढले आहेत. ते खालीलप्रमाणें :—

(१) जमीन, मेहनत आणि भांडवल ह्यांचा सहकारी पद्धतीनें उपयोग केला पाहिजे असें टागोरांचें मत होतें. वैयक्तिक प्रयत्नांस आणि स्पर्धेस निर्विवाद महत्त्व आहे, पण मर्यादेचें अतिक्रमण झालें कीं धोका निर्माण होतो. (२) सहकाराचे द्वाराच भारतीय शेतकऱ्याचा उद्धार होईल. माझें शेत हें एक स्वतंत्र केंद्र आहे असें शेतकऱ्यानें मानलें नाहीं, आजूबाजूची जमीन एकत्रित केली गेली, तर कमी नांगर व बैल पुरतील आणि श्रम वायां जाणार नाहींत. (३) श्रम वांचविण्यासाठी आणि उत्पादन वाढविण्यासाठी यांत्रिकीकरणाची आवश्यकता आहे. (४) भारतीय शेतकऱ्याला फार घाई करतां कामा नये. परंपरेनें चालत आलेल्या शरीराच्या व मनाच्या संवयी एकाएकीं बदलतां येणार नाहींत. (५) भांडवल आणि उत्पादनाचीं इतर साधनें ह्यांचें थोड्याशा हातांत एकत्रीकरण होणें सामाजिक दृष्ट्या हिताचें नाहीं. (६) खूप पैसा मिळविणारे धनिक आणि कामगार ह्यांत एकसारखा संघर्ष चालू असतो; कामगारवर्गाचा ह्रास भांडवलदाराच्या तोंडीचा असतो.

१९२२ सालीं, खेड्यांची पुनर्घटनेची भाषा ऐकूं येण्यापूर्वी किती तरी आधीं टागोरांनीं इन्स्टिट्यूट ऑफ रूरल रीकन्स्ट्रक्शनची स्थापना केली होती; प्रोफेसर एल्. एल्महर्स्ट हे तिचे पहिले डायरेक्टर होते.

## वार्षिक अहवाल कसा असावा ?

ब्रायटन येथें इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक रिलेशन्सची परिषद् भरली होती, त्यावेळीं कंपन्यांच्या वार्षिक अहवालांच्या पद्धतीवर चर्चा झाली. वार्षिक अहवालांत खालील नऊ गोष्टी असाव्यात, असें सुचविण्यांत आलें :—(१) आवश्यक ते सर्व हिशेब. (२) खुलाशासाठी जादा आंकडे. (३) वर्षांतील उलाढालींचा सोप्या शब्दांत व आंकड्यांत आढावा. (४) दहा वर्षांची तुलना. (५) कंपनीशीं संबंधित अशा आर्थिक घडामोडींचा आढावा. (६) फर्मच्या वेगवेगळ्या घटकांची व विभागांची कामगिरी. (७) आर्थिक रचना. (८) आकर्षक मांडणी. (९) कंपनीच्या पुढील योजना. वार्षिक अहवालाचा उपयोग जनतेची दिशाभूल करणारा किंवा चेअरमनची नसती प्रतिष्ठा वाढविणारा नसावा.

## गिऱ्हाइकांची सेवा : अमेरिकन प्रकार

मिल्वॉकीच्या फर्स्ट विसकॉनसिन नॅशनल बँकेनें आपल्या गिऱ्हाइकांची एका नव्या प्रकारें सेवा करण्यास प्रारंभ केला आहे. बँकेच्या हेलिकॉप्टरमध्यें बँकेचा फोटोग्राफर बसतो आणि बँकेच्या गिऱ्हाइकांच्या कारखान्यांवरून आणि कचेऱ्यांवरून भ्रमण करून आकाशांतून त्यांचीं अभिनव बाजूनें छायाचित्रें घेतो. ११"×१४" आकाराचीं हीं चित्रें खास कागदावर छापून आणि १६"×२०" पुठ्ठ्यावर बसवून तीं गिऱ्हाइकांना नजर केलीं जातात. गिऱ्हाईक त्यामुळें खुष होतात आणि आपल्या कचेऱ्यांतून हीं छायाचित्रें अभिमानानें लावून ठेवतात. आपल्या वार्षिक अहवालांत आणि इतर प्रकाशनांत तीं समाविष्ट करण्यासाठी चित्रांचीं निगेटिव्ह ते मागून घेतात.

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

### गेल्या वर्षी ४२·५० कोटी रु. नफा

| | वर्षांतील खर्च | |
|---|---|---|
| | ३०–६–६१ | ३०–६–६० |
| **उत्पन्न** | रु. | रु. |
| व्याज, डिस्कौंट, एक्स-चेंज, कमिशन, इ. | ५२,०७,०५,६५९ | ४७,५६,९८,१९१ |
| **खर्च** | | |
| पगार | ४,२९,६४,५९७ | ३,९९,९०,२११ |
| डायरेक्टरांचा मेहेनताना | ८०,४१५ | ७९,१५७ |
| ऑडिटरांची फी | ३०,००० | २२,५०० |
| भाडें, कर, विमा, लाइटिंग | २६,०७,८०६ | २१,४६,६८२ |
| वकिली खर्च | ७९,४५० | ४७,२९६ |
| पोस्टेज, तारा | ३,६४,०९६ | ३,४४,७४४ |
| पैशाची वर्गावर्गी | ३३,२९,१४८ | २०,२७,९२६ |
| स्टेशनरी | १०,५३,२५२ | ९,६१,०३४ |
| चेक्स–नोटा छपाई | १,७४,५१,८९८ | १,१९,७८,६६६ |
| घसारा | ५३,५४,४०७ | ४६,३३,०१३ |
| एजन्सी चार्जेस | १,७५,१७,५१७ | १,०१,१२,८७५ |
| प्राव्हिडंट फंड, इ. | ७,३२,००० | ७,३२,००० |
| इतर खर्च | ३१,४०,१७३ | २६,०९,४८१ |
| **भारत सरकारला दिले** | ४२,५०,००,८९५ | ४०,००,१२,६०२ |
| **एकूण** | ५२,०७,०५,६५९ | ४७,५६,९८,१९१ |

### चीनमध्यें शेतकऱ्याला उत्पादन करण्यास प्रलोभन

चीनचें सरकार आणि कम्युनिस्ट पक्ष ह्यांनीं आपल्या आर्थिक विचारसरणींत बदल केल्याचीं चिन्हें दिसत आहेत. कांहीं वर्षांपूर्वी चीननें शेतीच्या व्यवसायासाठी कम्यून पद्धतीचा अवलंब केला होता. विस्तीर्ण अशा शेतांची मालकी कम्यूनची म्हणजेच सार्वजनिक करण्यांत आली. त्याचा परिणाम असा झाला कीं कोणत्याच शेतकऱ्याला अगर शेतकऱ्यांच्या गटाला विशिष्ठ जमिनीची लागवड करण्याची जबाबदारी वाटेनाशी झाली. त्यामुळें पुष्कळ सार्वजनिक मालकीच्या शेतांत जमिनीकडे दुर्लक्ष होऊं लागलें व त्यांत तण माजूं लागले. कांहीं ठिकाणीं हे तण इतके वाढले आहे कीं ते काढण्यास ५ वर्षांचा अवधी सुद्धां पुरणार नाहीं. १९५९ सालीं व त्यापुढील वर्षी चीनमधील अन्नधान्याचें व शेतीचें उत्पादन बरेंच घटलें. पण उत्पादनांतील घटीची कारणमीमांसा करतांना चीनचें सरकार नैसर्गिक आपत्तीकडे बोट दाखवून मोकळे झाले. उत्पादनांतील घटीला कांहीं अंशीं नैसर्गिक आपत्ति कारणभूत झाल्या हें खरें; पण एवढें एकच कारण घटीला जबाबदार नव्हतें. उत्पादन वाढविण्यास शेतकऱ्याला पुरेसें प्रलोभन नव्हतें ही गोष्ट खरी होती. चीनमधील परदेशी प्रवाशांनीं ह्या कारणाकडे वेळोवेळीं लक्ष वेधलेलें होतें. आतां खुद्द कम्युनिस्ट चीनच्या सरकारलाच प्रलोभनाचें महत्त्व कळूं लागलेलें दिसतें. म्हणून शेतकऱ्याला उत्पादनाची प्रेरणा राहावी असे प्रयत्न करण्यांत येत आहेत. सार्वजनिक मालकीची मोठी शेती कायम ठेवून तींतच शेतकऱ्यांना छोटीशी जमीन देण्यांत येत आहे. ह्या जमिनींत त्यानें कोंबडी पाळण्याचा अगर डुकरें पाळण्याचा अगर भाजीपाला लावण्याचा धंदा केल्यास धंद्यांतील उत्पादन ग्रामीण भागांतील जत्रेसारख्या प्रसंगीं विकण्याची सवलत त्यास देण्यांत आली आहे. ह्या जत्रा सरकारनें अलीकडे बंद केल्या होत्या.


टेलिफोन नं. ३४८३. तार :

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

**इकडे वेळींच लक्ष द्या..........**

**आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत रहा.**

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | | | व्याजाचे नवीन दर |
|---|---|---|---|
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षे | ... | ... | ४। टक्के |
| ३ वर्षे | ... | ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव | ... | ... | २॥ टक्के |

या शिवाय शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

बा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

स्थापना : १९११

टेलिफोन, नं. २५५४७४–७५

पोस्ट बॉक्स नं. ४७२ तारेचा पत्ता—कामरबँक

मुख्य कचेरी– ९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

**ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.**

| | |
|---|---|
| भरणाई झालेलें भांडवल | रु. १ कोटी, ४५ लक्ष |
| गंगाजळी व फंड | रु. ७२ ,, |
| ठेवी | रु. १४ कोटी, १६ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु, २७ कोटी |

**महाराष्ट्र राज्यांतील, शाखा व संलग्न बँका २०४**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींसाठी चौकशी करावी.

चिं. द. दाते, कार्यकारी संचालक.

## १ आणा म्हणजे ६·२५ नये पैसे
### अलाहाबाद हायकोर्टाचा निर्णय

१ आणा म्हणजे ६·२५ नये पैसे होतात, असा निकाल अलाहाबाद हायकोर्टानें नुकताच दिला आहे. यू. पी. सेल्स टॅक्स (अमेंडमेंट) ॲक्टानें म्हटलें आहे कीं, मूळ कायद्यांत सेल्स टॅक्सचा दर रुपयाला एक आणा होता, तो नया पैशांत सांगितलेला आहे, असें मानावें. कानपूर येथील एका व्यापाऱ्यावर कर आकारणी करण्यांत आली, ती रुपयाला ६·२५ नये पैसे ह्या दरानें. एका आण्याचे ६ नये पैसे धरायला पाहिजेत, असें त्या व्यापाऱ्याचें म्हणणें होतें. पण त्याची रिट पेटिशन हायकोर्टानें फेटाळून लावली.

### संततिप्रतिबंधक स्वस्त गोळीची आवश्यकता

इंडिअन इन्स्टिट्यूट फॉर पाप्युलेशन स्टडीजचे डायरेक्टर डॉ. चंद्रशेखर ह्यांनीं संततिप्रतिबंधक स्वस्त व कार्यक्षम गोळ्या तयार करण्याची व त्या वाटण्याची तातडीची गरज आहे असें मत व्यक्त केलें आहे. इंटरनॅशनल इंडस्ट्रिअल कॉन्फरन्स ह्या संघटनेपुढें अमेरिकेंत बोलतांना ते म्हणाले कीं, आशिआ खंडांतील जनतेंत कुटुंबनियोजनाची नेहमींचीं साधनें अयशस्वी ठरलेलीं आहेत. त्यामुळें जगांतील ८० टक्के लोकांना रोज एक वेळसुद्धां भरपूर जेवण मिळत नाहीं. आशिआमधील लोकांचे दर डोई सरासरी वार्षिक उत्पन्न अवघें ५० ते २०० डॉलर्स आहे. अशा परिस्थितींत ५ ते ११ वर्षे वयाच्या २५ कोटी मुलांना शाळेंत सुद्धां जातां येणार नाहीं. अमेरिका आशिआंतील देशांना प्रचंड प्रमाणावर मदत करीत आहे. परंतु जगभर कुटुंबनियोजनाचा यशस्वी आचार झाल्याशिवाय ही मदत वायां जाईल.

### आय. ए. एस. मध्यें मद्रासचें प्रमाण ज़ास्त कां ?

इंडियन ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसमध्यें परीक्षा देऊन दाखल होणाऱ्यांत मद्रास विद्यापीठाचे विद्यार्थी सर्वांत अधिक असतात. १९४८–१९६० ह्या मुदतींत आय. ए. एस. मध्यें ६१५ जणांच्या नेमणुका झाल्या, त्यांपैकीं मद्रास विद्यापीठाचे १६७ (२७·१%) विद्यार्थी होते. त्याखालोखाल दिल्ली विद्यापीठ (१२·०३%), अलाहाबाद विद्यापीठ (१०·४%) आणि पंजाब विद्यापीठ (८·९%) ह्यांचे अनुक्रम लागतात. मद्रासमध्यें सिव्हिल सर्व्हिसची उत्कृष्ट परंपरा आहे; मद्रास विद्यापीठानें शिक्षणाचा दर्जा सतत उच्च राखला आहे; मुंबई आणि कलकत्त्याप्रमाणें मद्रासमध्यें औद्योगिक आणि इतर क्षेत्रांत तेथील पदवीधरांना आकर्षण वाटण्याजोग्या नोकऱ्या नाहींत; विद्यार्थ्यांच्या वशिल्याचे प्रकार इतर विद्यापीठांप्रमाणें मद्रास विद्यापीठांत कधींच घडलेले नाहींत. भारतांतील लोकसंख्येपैकीं ८५% हिंदू आहेत आणि त्यांचें आय. ए. एस. मधील प्रमाण ८९% आहे. लोकसंख्येपैकीं फक्त २·३% ख्रिस्ती असून आय. ए. एस. मधील प्रमाण १२·९ आहे. मुसलमानांचीं तत्सम प्रमाणें ९·९३% आणि २% अशीं आहेत. शेड्यूल्ड कास्ट्स आणि शेड्यूल्ड ट्राइब्स् ह्यांच्यासाठी अनुक्रमें १२·५% आणि ५% जागा राखून ठेवल्या असूनहि त्यांचीं प्रत्यक्ष प्रमाणें फक्त २·१% आणि १·५% अशीं पडतात. यशस्वी उमेदवारांच्या पालकांच्या व्यवसायाचा विचार केला तर बहुसंख्य पालक सरकारी नोकर असतात. त्यांचे खालोखाल शिक्षक, वकील, व्यापारी आणि शेतकरी ह्या अनुक्रमानें येतात. ७९% यशस्वी उमेदवार शहरांतच वाढलेले होते; त्यांची पार्श्वभूमि सर्वस्वीं शहरीच होती. स्त्रियांची संख्या ३·१% भरली.





**बेडेकर**
**मसाले, लोणचीं व पापड**
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखाः ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

**५०** वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईंतील एक प्रसिद्ध निवासस्थान
**★ सरदारगृह ★**
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

**माधवाश्रम** लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

**कौटुंबिक हितगुज**
श्री. वा. काळे ह्यांनीं अत्यंत सोप्या व चटकदार भाषेंत लिहिलेल्या लेखमालेनें ‘किर्लोस्कर’च्या हजारों वाचकांची पकड घेतली आहे. ह्या लेखमालेंतील निवडक लेख एकत्रित केलेला संग्रह ‘किर्लोस्कर प्रेस’तर्फे प्रसिद्ध होत आहे.
पृ. सं. अंदाजें ११२] [किंमत ३ रु.

**कण आणि क्षण**
(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)
लेखकः –श्री. वा. काळे, संपादक, “अर्थ”
मराठी दुसरी आवृत्ति] [किं. १ रु. ८ आ.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व ‘दुर्गाधिवास’ ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.